**वाचा :** महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२३/ प्र.क्र.४६/सेवा-४ दिनांक ०२/०२/२०२४

जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२४/३६६
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
दिनांक :-१७/०२/२०२४

**कार्यालयीन परिपत्रक :**

या परिपत्रकान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत सर्व विभाग प्रमुख/ शाखा प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णयान्वये दिनांक ०१/११/२००५ पुर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगीक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात आलेला आहे.

संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगीक नियम लागू करण्याचा सदर पर्याय हा सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे शासकीय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) लागू राहील. अधिकारी/कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील, अशा तरतूदी आहेत.

करीता संदर्भीय शासन निर्णयान्वये दिनांक ०१/११/२००५ पुर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागात (वर्ग-१ ते ३ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आस्थापना-१ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांनी आस्थापना -२) विहीत मुदतीत एक वेळ पर्याय (One Time Option) सादर करावेत.

**आयुक्त तथा प्रशासक**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**प्रति,**
**सर्व विभाग प्रमुख / शाखा प्रमुख**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

दिनांक :      /      /2024

**प्रति,**

**मा.आयुक्त महोदय,**

महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**विषय :** दि.01/11/2005 पुर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.01/11/2005 रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत.

**संदर्भ :** कार्यालयीन परिपत्रक क्र.मनपा/आस्था-1/2024/      दिनांक      /02/2024

**महोदय,**

वरील संदर्भिय परिपत्रकान्वये महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगीक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) सादर करणेबाबत कळविले आहे.

सबब दिनांक    /    /20    रोजीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने --------------------------- पदासाठी अर्ज सादर केला होता. त्यानूसार माझी नियुक्ती होऊन मी दिनांक    /    /    रोजी महानगरपालिका आस्थापनेवर रूजू झालेलो आहे.

करीता मी श्री/श्रीमती ------------------------------------------------ पदनाम ------------- ---------------- असे लिहून देतो/देते की, **मी आज दिनांक    /    /2024 रोजी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम,** 1982, **महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण)** 1984 **व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगीक नियमाच्या तरतुदी लागू करण्याचा पर्याय स्विकारत आहे.** तसेच मी सादर करीत असलेला पर्याय/विकल्प हा अंतिम असणार असल्याची मला जाणीव आहे. त्यानूसार मला शासन निर्णयात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने लाभ देण्यात यावेत, ही विनंती.

**आपला/आपली विश्वासू**

श्री / श्रीमती --------------------------------

पदनाम :------------------------------------

विभागाचे नांव :----------------------------

मो.क्र. :-----------------------------------